Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

जा.क्र. : कोमं/डीपी गुणवत्ता वाढ/२०२६-२७/४३८८
दिनांक : २० / ११ / २०२६.

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषय : फेब्रुवारी मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेच्या निकालात गुणवत्ता वाढ करण्यासाठी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी मागील वर्षाच्या निकालाचे सांख्यिकी विश्लेषण करून उद्दिष्टाधारित कृती आराखडा तयार करण्याबाबत.

संदर्भ : १. राज्य मंडळ, पुणे प्रकाशित शिक्षण संक्रमण मासिक सप्टेंबर २०२६ - दहावी बारावी बोर्ड परीक्षेचा राजमार्ग
२. कोकण व कोल्हापूर विभागीय मंडळ आयोजित संस्थाचालक, प्राचार्य / मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघटना ऑनलाईन बैठक दि. १३/१०/२०२६.
३. कोकण व कोल्हापूर विभागीय मंडळ आयोजित प्राचार्य / मुख्याध्यापक यांची सप्टेंबर, ऑक्टोंबर मासिक ऑनलाईन आढावा बैठक.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडून फेब्रुवारी मार्च २०२७ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा आयोजित करण्यात येणार आहेत. परीक्षेचे वेळापत्रकही जाहिर झाले आहे. या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा घडवून आणणे, प्रत्येक विषयातील अध्ययन निष्पत्ती वाढविणे, तोंडी व प्रात्याक्षिक परीक्षेच्या तुलनेत लेखी परीक्षेतील कामगिरी सुधारणे, तसेच ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कमी करणे या उद्देशाने शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न होणे आवश्यक आहे.

मागील वर्षांच्या परीक्षांच्या निकालातील केवळ उत्तीर्णांची टक्केवारी न पाहता, नियमित विद्यार्थ्यांची गुणश्रेणीनिहाय संख्या, विषयवार कामगिरी, शिक्षकनिहाय निकाल, शाखानिहाय निकाल, तोंडी व लेखी परीक्षेतील गुणांमधील तफावत, प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेतील तफावत तसेच ग्रेस गुणांमुळे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या या सर्व बाबींचे सांख्यिकी विश्लेषण करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यांतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी नियमित परीक्षार्थ्यांकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. श्रेणीनिहाय निकालाचे विश्लेषण व गुणवत्ता वाढीचे उद्दिष्ट , ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कमी करणे.

१.अ-१) मागील वर्षाच्या दहावी व बारावीच्या निकालातील नियमित विद्यार्थी संख्येची खालील सहा श्रेणींमध्ये विभागणी करावी. त्यामध्ये प्रचलित टप्प्यांशिवाय ९० ते १०० हा अधिकचा उच्च टप्पा स्वतंत्रपणे तयार करावा.

अ. ९० ते १०० टक्के, **आ.** ७५ ते ८९ टक्के **इ.** ६० ते ७४ टक्के **ई.** ४५ ते ५९ टक्के **उ.** ३५ ते ४४ टक्के **ऊ.** ० ते ३४ टक्के

प्रत्येक श्रेणीतील विद्यार्थ्यांची संख्या व एकूण परीक्षार्थींच्या तुलनेत त्यांची टक्केवारी स्वतंत्रपणे नोंदवावी. त्यानंतर फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चित करावे.

उद्दिष्ट निश्चित करताना उच्च गुणश्रेणीतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे आणि कमी गुणश्रेणीतील विद्यार्थ्यांना पुढील गुणश्रेणीत आणणे यावर भर द्यावा. गुणवत्ता वाढ आराखडा तयार करताना ९० ते १०० व ७५ ते ८९ या श्रेणींतील विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी किमान प्रत्येकी ५% वाढीचे (म्हणजेच ७५% ते १००% या टप्प्यात १०% वाढीचे), तर ६० ते ७४ या श्रेणीतील विद्यार्थ्यांसाठी १०% वाढीचे उद्दिष्ट विचारात घ्यावे. ही वाढ मागील वर्षाच्या प्रत्यक्ष संख्येच्या आधारे मोजून पूर्णांकात निश्चित करावी.

यासाठी खालील स्तरांवर इयत्तानिहाय स्वतंत्र तक्ते तयार करावेत.

इयत्ता दहावी :	**इयत्ता बारावी :**
अ.१ शिक्षक स्तर (प्रत्येक शिक्षकांसाठी स्वतंत्र तक्ता)	अ.४ शिक्षक स्तर (प्रत्येक शिक्षकांसाठी स्वतंत्र तक्ता)
अ.२ विषय स्तर (संबंधित विषयाच्या शाळेतील सर्व तुकडया मिळून)	अ.५ विषय स्तर (संबंधित विषयाच्या कनिष्ट महाविद्यालयातील सर्व तुकडया मिळून)
अ.३ शाळा स्तर	अ.६ शाखा स्तर कला, वाणिज्य, विज्ञान व MCVC
	अ.७ कनिष्ठ महाविद्यालय स्तर

प्रत्येक तक्त्यात मागील वर्षांची विद्यार्थीसंख्या, गुणश्रेणीनिहाय विद्यार्थी संख्या, गुणश्रेणीनिहाय टक्केवारी व आगामी २०२७ परीक्षेचे उद्दिष्ट व उद्दिष्टाची टक्केवारी नोंदवावी.

१.अ-२. सवलतीच्या (ग्रेस) गुणांमुळे उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी करणे. (ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कमी करणे)

दहावी व बारावीच्या १०० गुणांच्या विषयात ३५ गुण उत्तीर्णतेसाठी आवश्यक असतात. लागू मंडळ नियमांनुसार उत्तीर्णतेसाठी काही गुण कमी पडणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना सवलतीच्या (ग्रेस) गुणांचा लाभ मिळू शकतो.

मात्र विद्यार्थ्यांनी केवळ ग्रेस गुणांच्या आधारे उत्तीर्ण होण्याऐवजी नियमित अध्ययन, सराव व लेखी परीक्षेतील गुणवत्तापूर्ण कामगिरीच्या आधारे उत्तीर्ण व्हावे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे.

त्यासाठी मागील वर्षी ग्रेस गुणांमुळे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या विषयवार व स्तरनिहाय नोंदवावी आणि फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी ही संख्या मागील वर्षाच्या तुलनेत ५०% ने कमी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करावे.

इयत्ता दहावीकरिता तीन तक्ते व इयत्ता बारावीकरिता चार असे वरील १.१ ला जोडून तक्ते तयार करावेत.

फेब्रु.-मार्च २०२६ परीक्षेत ग्रेस गुणांमुळे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या, एकूण परीक्षार्थींची संख्या, त्यांची टक्केवारी व २०२७ साठीचे उद्दिष्ट तक्त्यात नोंदवावे.

२.१ इयत्ता दहावी भाषा विषयांतील तोंडी व लेखी गुणांमधील तफावत कमी करणे.

इयत्ता दहावी प्रथम, द्वितीय व तृतीय भाषा विषयांच्या परीक्षेत तोंडी परीक्षेसाठी २० गुण व लेखी परीक्षेसाठी ८० गुण अशी एकूण १०० गुणांची रचना आहे.

काही विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेत २० पैकी १५ ते २० गुण मिळतात, मात्र त्याच विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेत ८० पैकी केवळ १ ते १० गुण मिळतात. तसेच लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय असते. या तफावतीचे विश्लेषण करून लेखी परीक्षेतील कामगिरी सुधारणे आवश्यक आहे.
त्याकरिता दहावीसाठी तीन तक्ते (ब१, ब२, ब३) तयार करावेत.

उद्दिष्ट निश्चिती :
- तोंडी परीक्षेत १५ ते २० गुण मिळवूनही लेखी परीक्षेत १ ते १० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत ५०% ने कमी करावी.
- लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत २५% ने कमी करावी.

करावयाची कार्यवाही :
- शिक्षक व विषय स्तरावर प्रत्येक विद्यार्थ्यांचे तोंडी व लेखी गुण स्वतंत्रपणे नोंदवावेत.
- वाचन, आकलन, शब्दसंग्रह, व्याकरण, शुद्धलेखन व लेखनकौशल्य यांचे निदान करावे.
- नियमित लेखी चाचण्या व वेळबद्ध उत्तरलेखनाचा सराव घ्यावा.
- तोंडी गुण व लेखी गुण यांतील तफावत असलेल्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन द्यावे.
- प्रथम, द्वितीय व तृतीय भाषा विषयांचे स्वतंत्र विश्लेषण करून सुधारणा उपाययोजना राबवाव्यात..

२.२ इयत्ता दहावी विज्ञान विषयातील प्रात्यक्षिक व लेखी गुणांमधील तफावत कमी करणे.

इयत्ता दहावीच्या विज्ञान विषयात प्रात्यक्षिक परीक्षेसाठी २० गुण व लेखी परीक्षेसाठी ८० गुण अशी एकूण १०० गुणांची रचना आहे.

इ. १० वीच्या काही विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेत २० पैकी १५ ते २० गुण मिळतात; मात्र लेखी परीक्षेत ८० पैकी केवळ १ ते १० गुण मिळतात. लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी करणे आवश्यक आहे.
त्याकरिता दहावीसाठी तीन तक्ते (ब ४, ब ५, ब ६) तयार करावेत.

उद्दिष्ट निश्चिती :
- प्रात्यक्षिक परीक्षेत इ. १० वीत १५ ते २० गुण मिळवूनही लेखी परीक्षेत १ ते १० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५०% ने कमी करावी.
- लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २५% ने कमी करावी.

करावयाची कार्यवाही :
- शिक्षक व विषय स्तरावर प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक व लेखी गुण स्वतंत्रपणे नोंदवावेत.
- मूलभूत वैज्ञानिक संकल्पना, संज्ञा, आकृत्या, निरीक्षणे, निष्कर्ष व कारणमीमांसा यांवर भर द्यावा.
- प्रात्यक्षिक कृतीमागील वैज्ञानिक तत्त्व लेखी स्वरूपात स्पष्ट करण्याचा सराव घ्यावा.
- लेखी परीक्षेतील प्रश्नप्रकारानुसार वेळबद्ध सराव व मूल्यमापन करावे.
- कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन व वैयक्तिक मार्गदर्शन करावे.

३.१ इयत्ता बारावी भाषा विषयांतील तोंडी व लेखी गुणांमधील तफावत कमी करणे.

इयत्ता बारावी प्रथम, द्वितीय व तृतीय भाषा विषयांच्या परीक्षेत तोंडी परीक्षेसाठी २० गुण व लेखी परीक्षेसाठी ८० गुण अशी एकूण १०० गुणांची रचना आहे.

काही विद्यार्थ्यांना तोंडी परीक्षेत २० पैकी १५ ते २० गुण मिळतात, मात्र त्याच विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेत ८० पैकी केवळ १ ते १० गुण मिळतात. तसेच लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय असते. या तफावतीचे विश्लेषण करून लेखी परीक्षेतील कामगिरी सुधारणे आवश्यक आहे.
त्याकरिता बारावीसाठी चार तक्ते (क १, क२ , क ३, क ४) तयार करावेत.

उद्दिष्ट निश्चिती :
- तोंडी परीक्षेत १५ ते २० गुण मिळवूनही लेखी परीक्षेत १ ते १० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागील वर्षांच्या तुलनेत ५०% ने कमी करावी.
- लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत २५% ने कमी करावी.

करावयाची कार्यवाही :
- शिक्षक व विषय स्तरावर प्रत्येक विद्यार्थ्यांचे तोंडी व लेखी गुण स्वतंत्रपणे नोंदवावेत.
- वाचन, आकलन, शब्दसंग्रह, व्याकरण, शुद्धलेखन व लेखनकौशल्य यांचे निदान करावे.
- नियमित लेखी चाचण्या व वेळबद्ध उत्तरलेखनाचा सराव घ्यावा.
- तोंडी गुण व लेखी गुण यांतील तफावत असलेल्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन द्यावे.
- प्रथम, द्वितीय व तृतीय भाषा विषयांचे स्वतंत्र विश्लेषण करून सुधारणा उपाययोजना राबवाव्यात..

३.२ इयत्ता बारावी विज्ञान तसेच प्रात्यक्षिक असणाऱ्या विषयातील प्रात्यक्षिक व लेखी गुणांमधील तफावत कमी करणे.

बारावीच्या विज्ञान विषयात प्रात्यक्षिक परीक्षेसाठी ३० गुण व लेखी परीक्षेसाठी ७० गुण अशी एकूण १०० गुणांची रचना आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान आणि MCVC शाखेतील विषयांमध्ये प्रात्यक्षिकांचा समावेश आहे.

इ. १२ वीच्या काही विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेत ३० पैकी २५ ते ३० गुण मिळतात; मात्र लेखी परीक्षेत ७० पैकी केवळ १ ते १० गुण मिळतात. लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही कमी करणे आवश्यक आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान आणि MCVC शाखेतील विषययोजना वेगवेगळी आहे. त्यानुसार तक्त्यात तशी सुधारणा करुन तक्ते वापरावेत. **त्याकरिता बारावीसाठी चार तक्ते (क ५, क ६, क ७, क ८) तयार करावेत.**

उद्दिष्ट निश्चिती :

- इ. १२ वीत प्रात्यक्षिक परीक्षेत २५ ते ३० गुण मिळवूनही लेखी परीक्षेत १ ते १० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५०% ने कमी करावी.
- लेखी परीक्षेत ११ ते २० गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २५% ने कमी करावी.

करावयाची कार्यवाही :

- शिक्षक व विषय स्तरावर प्रत्येक विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक व लेखी गुण स्वतंत्रपणे नोंदवावेत.
- मूलभूत वैज्ञानिक संकल्पना, संज्ञा, आकृत्या, निरीक्षणे, निष्कर्ष व कारणमीमांसा यांवर भर द्यावा.
- प्रात्यक्षिक कृतीमागील वैज्ञानिक तत्त्व लेखी स्वरूपात स्पष्ट करण्याचा सराव घ्यावा.
- लेखी परीक्षेतील प्रश्नप्रकारानुसार वेळबद्ध सराव व मूल्यमापन करावे.
- कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापन व वैयक्तिक मार्गदर्शन करावे.

४. तक्ते भरण्याची पद्धत व उद्दिष्ट निश्चित करण्याबाबत सूचना

सर्व संबंधित तक्ते भरताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करावे.

१. मागील वर्षाची माहिती : शाळा अभिलेख (निकालाचे मंडळाचे स्कूल रजिस्टर - S R) चा वापर करुन फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेतील प्रत्यक्ष निकालपत्रक, गुणपत्रक, विषयवार निकाल व शाळेच्या अधिकृत नोंदी यांच्या आधारेच विद्यार्थी संख्या नोंदवावी. राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या निकालाची सांख्यिकीय माहिती या टॅब अंतर्गत शाळा व क.महाविद्यालयनिहाय सांख्यिकीय माहितीही उपलब्ध आहे, त्याचाही उपयोग करु शकता. (https://mahahsscboard.in/mr/statistics)

२.शिक्षकस्तर : संबंधित शिक्षकाने शिकविलेल्या विषयातील विद्यार्थ्यांची संख्या व निकालाचे विश्लेषण करावे. एकाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या विषयांत नोंद होणे स्वाभाविक आहे.

३. विषय स्तर : संबंधित विषय शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांची व सर्व तुकड्यांची माहिती एकत्रित करावी.

४. शाखा स्तर : बारावीमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व MCVC या शाखांची स्वतंत्र माहिती संकलित करून शाखानिहाय विश्लेषण करावे.

५. शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तर : सर्व विषय व शाखांची माहिती एकत्रित करून शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल व गुणश्रेणीनिहाय स्थिती निश्चित करावी.

६. टक्केवारीची गणना : प्रत्येक तक्त्यात खालील सूत्र वापरावे.

गुणश्रेणीतील विद्यार्थी टक्केवारी = (संबंधित गुणश्रेणीतील विद्यार्थी संख्या भागिले एकूण विद्यार्थी संख्या) x १००
ग्रेस गुणांमुळे उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी = (ग्रेस गुणांमुळे उत्तीर्ण विद्यार्थी संख्या भागिले एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या) x १००

७. उद्दिष्टाची गणना : मागील वर्षाच्या प्रत्यक्ष विद्यार्थी संख्येच्या आधारेच २०२७ चे उद्दिष्ट निश्चित करावे. उदाहरणार्थ, मागील वर्षी ग्रेस गुणांमुळे २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असतील, तर ५०% कपातीचे उद्दिष्ट १० विद्यार्थी असेल.

८. पूर्णांकातील उद्दिष्ट : टक्केवारीवरून विद्यार्थी संख्या निश्चित करताना पूर्णांक वापरावा. आवश्यकतेनुसार कपातीचे उद्दिष्ट साध्य होईल अशा पद्धतीने संख्या निश्चित करावी.

९. प्रत्यक्ष व उद्दिष्ट यांची तुलना : प्रत्येक मासिक, घटक चाचणी, प्रथम सत्र परीक्षेनंतर विद्यार्थ्यांच्या प्रगतीची नोंद ठेवावी. अपेक्षित उद्दिष्टापेक्षा प्रगती कमी असल्यास सुधारित अध्यापन व मार्गदर्शन आराखडा तयार करावा.

१०. कृती आराखडा : प्रत्येक तक्त्याखाली संबंधित स्तराला लागू असणाऱ्या उपाययोजना नमूद कराव्यात. शिक्षक स्तरावरील उपाय शिक्षकांच्या अध्यापनाशी, विषय स्तरावरील उपाय विषयाच्या सामूहिक नियोजनाशी, तर शाळा / शाखा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील उपाय संस्थात्मक समन्वयाशी संबंधित असावेत.

११. माहितीची सत्यता : सर्व तक्त्यांतील एकूण विद्यार्थी संख्या, गुणश्रेणीनिहाय संख्या व टक्केवारी यांची परस्पर पडताळणी करावी.

१२. जबाबदारी : शिक्षक स्तरावरील तक्त्यावर संबंधित शिक्षकाची, विषय स्तरावरील तक्त्यावर विषयप्रमुखाची, तर शाळा / शाखा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील तक्त्यावर शाखाप्रमुख/ उपप्राचार्य / मुख्याध्यापक / प्राचार्य यांची स्वाक्षरी असावी.

५. उद्दिष्टाधारित कृती आराखड्याची अंमलबजावणी

सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी वरील सर्व तक्ते प्रत्यक्ष निकालाच्या आधारे पूर्ण करून त्यांचे विश्लेषण करावे. केवळ तक्ते तयार करणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, त्यातून निष्पन्न झालेल्या त्रुटींवर प्रत्यक्ष अध्यापन व अध्ययन प्रक्रियेत सुधारणा घडवून आणणे अपेक्षित आहे.

यासाठी पुढील कार्यवाही करावी.

- प्रत्येक शिक्षकाने आपल्या विषयातील कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी तयार करावी.
- विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन वैयक्तिक मार्गदर्शन, उपचारात्मक अध्यापन व नियमित सरावाचे नियोजन करावे.
- घटक चाचण्या, सराव परीक्षा, बोर्ड नमुना प्रश्नपत्रिका व वेळबद्ध उत्तरलेखन यांचा नियमित वापर करावा.
- विषयप्रमुखांनी विषयवार निकालाचा आढावा घेऊन शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन करावे.
- मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी शाळा / कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर नियमित गुणवत्ता वाढ आढावा बैठक घ्यावी.
- पालकांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या उपस्थिती, अभ्यासातील सातत्य व सराव परीक्षांतील प्रगतीवर लक्ष ठेवावे.
- निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या तुलनेत प्रत्यक्ष प्रगतीची नोंद ठेवून आवश्यकतेनुसार कृती आराखड्यात बदल करावेत.

६. अहवाल सादरीकरण -

सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाचही जिल्ह्यांतील सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयांनी वरील सूचनांनुसार दहावी व बारावीचे सर्व लागू तक्ते पूर्ण करावेत.

सर्व तक्त्यांमध्ये मागील वर्षांची प्रत्यक्ष माहिती, २०२७ परीक्षेसाठी निश्चित केलेले उद्दिष्ट, टक्केवारीची गणना, स्तरनिहाय कृती उपाययोजना व संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असाव्यात.

पूर्ण केलेला गुणवत्ता वाढ कृती आराखडा शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभिलेखात जतन करावा व विभागीय मंडळ / संबंधित शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून मागणी झाल्यास सादर करावा. प्राचार्य मुख्याध्यापकांच्या ऑफलाईन सभेत सांख्यिकी विश्लेषण व उद्दिष्ट याची माहिती सादर करावी.

मागील निकालाचे अचूक विश्लेषण, प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण निरीक्षण आणि उद्दिष्टाधारित अध्यापन नियोजन यांतूनच गुणवत्तापूर्ण निकालाची निर्मिती होऊ शकते.

फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या दहावी व बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी समन्वयाने आणि जबाबदारीने कार्यवाही करावी.

७. विभागीय मंडळ स्तरावरील फेब्रु.-मार्च २०२६ निकालाचे विश्लेषण व फेब्रु.-मार्च २०२७ साठी उदिष्ट

कोल्हापूर विभागीय मंडळ व कोकण विभागीय मंडळ स्तरावर नियमित परीक्षार्थ्यांबाबत ७५ ते १०० टक्के, ६० ते ७५ टक्के या गुणश्रेणीत मागील वर्षांच्या तुलनेत १० टक्के विद्यार्थी वाढीचे उदिष्ट ठेवण्यात येत आहे. ० ते ३४ या श्रेणीत शून्य टक्के विद्यार्थी संख्येचे उदिष्ट ठेवण्यात येत आहे. तसेच सवलतीच्या (ग्रेस) गुणांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मागील वर्षांच्या तुलनेत ५० टक्के विद्यार्थी कमी (घट) करण्याचे उदिष्ट ठेवण्यात येत आहे.

दोन्ही विभागीय मंडळांचा सांख्यिकीय तक्ता सोबत जोडला आहे. विभागीय मंडळाचे उदिष्ट साध्य होण्यासाठी जिल्हा, तालुका, परिरक्षक, शाळा व क.महाविद्यालय स्तरावर त्यास अनुसरुन उदिष्ट साध्यतेसाठी सातत्यपुर्ण व जाणीवपुर्वक प्रयत्न करावेत. पुढील वर्षी विश्लेषण आणि उदिष्टामध्ये आणखी सुक्ष्मता आणि अचूकता आणण्यासाठीही प्रयत्न करावेत.

टीप :- उपरोक्त कृती कार्यक्रम मागील वर्षांच्या तुलनेत निकालात गुणवत्ता वाढ करणे हा असून शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील उपलब्ध मनुष्यबळ, उपलब्ध वेळ लक्षात घेऊन त्यात लवचिकता ठेवावी. तसेच अवास्तव उद्दिष्टही ठेवू नये.

20/11/26

(राजेश क्षीरसागर)
विभागीय अध्यक्ष,
कोकण व कोल्हापूर विभागीय मंडळ

सोबत - विभागीय मंडळ विश्लेषण व उद्दिष्ट माहिती तसेच शिक्षकस्तर, विषयस्तर, शाखास्तर, शाळा कनिष्ट महाविद्यालयस्तर, निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व उद्दिष्ट निश्चिती नमुना तक्ते.

१. **A - कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर निकालाचे विश्लेषण व उद्दिष्ट**
२. **B - कोकण विभागीय मंडळ, रत्नागिरी निकालाचे विश्लेषण व उद्दिष्ट**
३. **अ.१ ते अ.७ :**
   गुणश्रेणीनिहाय निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व गुणवत्ता वाढीचे उद्दिष्ट ,
   ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कमी करणे.
४. **ब.१ ते ब.६ :**
   इयत्ता दहावी भाषा विषयात तोंडी व लेखी गुणांमधील तफावत दूर करणे, प्रात्यक्षिक व लेखी गुणांमधील तफावत दूर करणे.
५. **क.१ ते क.८ :**
   इयत्ता बारावी भाषा विषयात तोंडी व लेखी गुणांमधील तफावत दूर करणे, प्रात्यक्षिक व लेखी गुणांमधील तफावत दूर करणे.

प्रत माहितीसाठी

१. मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे.
२. मा.जिल्हाधिकारी, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदूर्ग.

प्रत कार्यवाहीसाठी

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
२. प्राचार्य, डाएट, सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदूर्ग.
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे

इयत्ता १० वी SSC व इयत्ता १२ वी HSC निकाल विश्लेषण, उद्दिष्ट निश्चिती व कृती आराखडा

वापरण्याची सूचना : या नमुन्यात प्रत्यक्ष शाळा/शिक्षक/विषयनिहाय निकालाची आकडेवारी २०२६ च्या स्तंभात भरावी. त्या भरल्यानंतर २०२७ चे विद्यार्थी-संख्येचे उद्दिष्ट निश्चित करावे. सर्व श्रेणींची बेरीज एकूण विद्यार्थीसंख्येशी जुळते याची खात्री करावी.

श्रेणींची व्याख्या : ९० ते १००%, ७५ ते ८९%, ६० ते ७४%, ४५ ते ५९%, ३५ ते ४४%, ० ते ३४%. उद्दिष्ट वाढीचे गृहितक: ९० ते १०० मध्ये + ५%, ७५ ते ८९ मध्ये + ५%, ६० ते ७४ मध्ये + १०% विद्यार्थी (मागील त्या श्रेणीतील संख्येच्या तुलनेत) अपेक्षित वाढ एकूण विद्यार्थीसंख्येच्या टक्केवारीतील गुणांमध्ये अभिप्रेत असेल.

खालील प्रत्येक तक्ता स्वतंत्रपणे भरावा. शिक्षक-स्तरासाठी संबंधित शिक्षकाच्या अध्यापनातील विद्यार्थ्यांचा समूह; विषय-स्तरासाठी विषयातील सर्व विद्यार्थी, शाखास्तरासाठी शाखेतील सर्व, शाळा/ क.महाविद्यालय - स्तरासाठी सर्व परीक्षार्थी विचारात घ्यावेत.

अ.क्र.	इयत्ता	तपशील	तक्ता क्र.
१	१०वी	निकाल सांख्यिकीय विश्लेषण व उदिष्ट	अ १, अ २, अ ३
२	१२वी	निकाल सांख्यिकीय विश्लेषण व उदिष्ट	अ ४, अ ५, अ ६, अ ७
३	१०वी	तोंडी व प्रात्यक्षिक गुण आणि लेखी गुणातील तफावत दूर करणे	ब १, ब २, ब ३ ,ब ४, ब ५, ब ६
४	१२वी	तोंडी व प्रात्यक्षिक गुण आणि लेखी गुणातील तफावत दूर करणे	क १, क २, क ३ ,क ४, क ५, क ६, क ७, क ८

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

शिक्षक स्तर (तक्ता अ-१.१)

परीक्षा: विश्लेषण इयत्ता १० वी (SSC) २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

शिक्षकाचे नाव: _____ विषय/शाखा: _____ एकूण विद्यार्थी: _____

भाग - १ मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ **उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७**

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ / घट (विद्यार्थी संख्या)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत : ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाळेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना :

- विद्यार्थीनिहाय गुणनोंद व श्रेणीनिहाय वर्गीकरण तयार करणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ताकद-कमतरता नोंदवून वैयक्तिक कृती आराखडा बनवणे.
- नियमित घटक चाचणी; उत्तरपत्रिकेचे निकषांनुसार विश्लेषण व पुनर्सराव.
- ६०% पेक्षा पुढील गटासाठी उच्चस्तरीय प्रश्न, वेळ व्यवस्थापन व पूर्ण उत्तरलेखनाचा सराव.
- ४५% पेक्षा कमी गटासाठी मूलभूत संकल्पना, छोट्या टप्प्यांत शिकवणे, नियमित सराव.
- दरमहा पालकांना प्रगती कळवणे व अनुपस्थितीवर त्वरित पाठपुरावा.
- ----------
- ----------

शिक्षकाचे नाव: _____ स्वाक्षरी: _____

दिनांक: / / २०२६.

१.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

निकालातील गुणवत्ता वाढ व ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कृती उपाययोजना :

- श्रेणीनिहाय मार्गदर्शनः ९०% + व ७५% + साठी उच्चस्तरीय प्रश्नपेढी सराव; ४५% पेक्षा कमी गुण असणाऱ्यांसाठी पायाभूत संकल्पना सराव.
- ग्रेस गुण कपात उपायः १ ते १० गुण कमी पडणाऱ्या विद्यार्थ्यांची विषयवार यादी करून त्यांच्यासाठी दररोज १ तास अतिरिक्त उपचारात्मक अध्यापन (Remedial Teaching) घेणे.
- गुणदान पॅटर्न सरावः उत्तरपत्रिकेत १ व २ गुणांच्या सोप्या प्रश्नांवर पकड निर्माण करणे जेणेकरून विद्यार्थी ग्रेस गुणांशिवाय थेट पासिंग मार्क्स (३५+) मिळवतील.
- पालक संवादः दरमहा चाचणीचा निकाल पालकांना दाखवून ग्रेसच्या धोक्याची कल्पना देणे व उपस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
-
-

विषय शिक्षक नाव व स्वाक्षरी

विषय प्रमुख नाव व स्वाक्षरी

मुख्याध्यापक / प्राचार्य नाव व स्वाक्षरी

दिनांक - / /२०२६

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे

निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

विषयस्तर (तक्ता अ-२.१)

परीक्षा: विश्लेषण इयत्ता १० वी (SSC) २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

विषय/शाखा: _____ एकूण विद्यार्थी: _____

भाग - १ मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ **उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७**

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाळेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना:

- मागील निकालाचे घटक/प्रकरण/प्रश्नप्रकारनिहाय विश्लेषण करणे.
- अभ्यासक्रमाचे वेळापत्रक, पुनरावृत्ती व सराव परीक्षांचे कॅलेंडर तयार करणे.
- सामायिक प्रश्नपेढी, आदर्श उत्तरे, गुणदान निकष व उत्तरलेखन मार्गदर्शिका वापरणे.
- कठीण घटकांसाठी उपचारात्मक अध्यापन; गुणवंत विद्यार्थ्यांसाठी समृद्धी उपक्रम.
- दर महिन्याला विषय शिक्षक बैठक घेऊन चाचणी निकाल व कृतींचा आढावा घेणे.
- ----------
- ----------

विषय शिक्षकांची नावे व स्वाक्षरी : १.
२.
३.
४.
५.

दिनांक: ____ / ____ / २०२६

अ २.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
विषयातील एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

विषय स्तरावर गुणवत्ता वाढ व ग्रेस गुण कपात उपाययोजना :

- सामायिक प्रश्नपेढी व गुणदान निकष: सर्व विषय शिक्षकांनी एकत्रितपणे आदर्श उत्तरपत्रिकांचे मॉडेल तयार करून विद्यार्थ्यांना सराव देणे.
- तोंडी/प्रात्यक्षिक व लेखी गुण तफावत दूर करणे: प्रात्यक्षिकात २० पैकी १५-२० गुण मिळणाऱ्या परंतु लेखीत कमी पडणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष लेखन चाचणी सराव घेणे.
- महिन्याला आढावा बैठक: दर महिन्याला विषय शिक्षकांची बैठक घेऊन चाचणी निकालांचे विश्लेषण करणे व ग्रेसच्या सीमेवरील विद्यार्थ्यांना पुढे आणणे.
- आकृत्या व संज्ञा सराव: विज्ञान व गणित यांसारख्या विषयांत आकृत्या, सूत्रे आणि व्याख्या यांचा रोज ५ मिनिटे वस्तुनिष्ठ सराव घेणे.

विषय शिक्षक (१) नाव व स्वाक्षरी

विषय शिक्षक (२) नाव व स्वाक्षरी

विषय शिक्षक (३) नाव व स्वाक्षरी

विषय प्रमुख नाव व स्वाक्षरी

दिनांक: / /२०२६

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

शाळास्तर (तक्ता अ-३.१)

परीक्षा: विश्लेषण इयत्ता १० वी (SSC) २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

प्राचार्य / मुख्याध्यापकांचे नाव: _____ एकूण विद्यार्थी: _____

मागील परीक्षा : विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाळेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना:

- मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली निकाल सुधारणा समिती स्थापन करणे.
- प्रत्येक शिक्षक, विषय व वर्ग/शाखेसाठी मासिक उद्दिष्टे आणि प्रगतीफलक ठेवणे.
- नियोजित सराव परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी व निकाल विश्लेषण वेळेत पूर्ण करणे.
- विद्यार्थ्यांची उपस्थिती, अभ्याससवयी, समुपदेशन व पालक संवाद यांचा नियमित आढावा.
- अतिरिक्त मार्गदर्शन तास, अध्ययन साहित्य, ग्रंथालय व प्रश्नसंच उपलब्ध करून देणे.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी उद्दिष्ट विरुद्ध प्रत्यक्ष प्रगतीचे पुनरावलोकन करून सुधारित कृती ठरवणे.
- ----------
- ----------

उपमुख्याध्यापक / उपप्राचार्य नाव व स्वाक्षरी

मुख्याध्यापक / प्राचार्य नाव _____ स्वाक्षरी: _____

दिनांक: / / २०२६

अ ३.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
शाळेतील एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

शाळा स्तरावर संस्थात्मक गुणवत्ता वाढ व ग्रेस गुण कपात उपाययोजना :

- निकाल सुधारणा समिती: मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून दर १५ दिवसांनी विषयनिहाय गतीचा आढावा घेणे.
- वेळबद्ध प्री-बोर्ड परीक्षा: बोर्डाच्या धर्तीवर किमान ३ सराव परीक्षांचे आयोजन व बारकाईने उत्तरपत्रिका तपासणी.
- समुपदेशन व विशेष मार्गदर्शन: अभ्यासात मागे पडणाऱ्या व ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण होण्याची शक्यता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे नियोजन व समुपदेशन.
- पालक सभा: ग्रेस गुणांच्या सवलतीवर अवलंबून न राहता स्वतःच्या गुणवत्तेवर उत्तीर्ण होण्यासाठी पालकांची सहकार्य बैठक.

उपमुख्याध्यापक/ उपप्राचार्य नाव व स्वाक्षरी

मुख्याध्यापक /प्राचार्य नाव स्वाक्षरी व शिक्का

दिनांक: / /२०२६

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

शिक्षकस्तर (तक्ता अ-४)

परीक्षा: इयत्ता १२ वी (HSC) विश्लेषण २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

शिक्षकाचे नाव: _____ विषय/शाखा: _____ एकूण विद्यार्थी: _____

मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाळेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना :

- विद्यार्थीनिहाय गुणपत्रक व श्रेणीनिहाय वर्गीकरण तयार करणे.
- प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी ताकद-कमतरता नोंदवून वैयक्तिक कृती आराखडा बनवणे.
- नियमित घटक चाचणी; उत्तरपत्रिकेचे निकषांनुसार विश्लेषण व पुनर्सराव.
- ६०% पेक्षा पुढील गटासाठी उच्चस्तरीय प्रश्न, वेळ व्यवस्थापन व पूर्ण उत्तरलेखनाचा सराव.
- ४५% पेक्षा कमी गटासाठी मूलभूत संकल्पना, छोट्या टप्प्यांत शिकवणे, नियमित सराव.
- दरमहा पालकांना प्रगती कळवणे व अनुपस्थितीवर त्वरित पाठपुरावा.
- ----------
- ----------

शिक्षकाचे नाव: _____ स्वाक्षरी: _____

दिनांक: / / २०२६

अ ४.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

HSC शिक्षक स्तरावर गुणवत्ता वाढ व ग्रेस गुण कपात उपाययोजना :

- घटकनिहाय प्रश्न सराव: १२ वीच्या दीर्घोत्तरी व लघुउत्तरी प्रश्नांचे गुणदान योजनेनुसार टप्प्याटप्प्याने लेखन सराव घेणे.
- ग्रेस गुणांवरील अवलंबित्व कपात: ३५ गुणांच्या सीमेवर असणाऱ्या विद्यार्थ्यांना किमान ४५+ गुणांचे लक्ष्य देऊन अतिरिक्त सराव संच देणे.
- प्रात्यक्षिक व लेखी समन्वय: विज्ञान/प्रॅक्टिकल विषयात प्रात्यक्षिक गुणांसोबत लेखी परीक्षेतील संकल्पना स्पष्टतेवर भर.
- वेळ व्यवस्थापन: ३ तासांत पूर्ण उत्तरपत्रिका सोडवण्याचा वर्गस्तरावर नियमित टाइम बाउंड सराव.
-
-

विषय शिक्षक नाव व स्वाक्षरी

दिनांक: / /२०२६

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

विषयस्तर (तक्ता अ-५)

परीक्षा: इयत्ता १२ वी (HSC) विश्लेषण २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

विषय/शाखा: _____ एकूण विद्यार्थी: _____

मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाळेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना:

- मागील निकालाचे घटक/प्रकरण/प्रश्नप्रकारनिहाय विश्लेषण करणे.
- अभ्यासक्रमाचे वेळापत्रक, पुनरावृत्ती व सराव परीक्षांचे कॅलेंडर तयार करणे.
- सामायिक प्रश्नपेढी, आदर्श उत्तरे, गुणदान निकष व उत्तरलेखन मार्गदर्शिका वापरणे.
- कठीण घटकांसाठी उपचारात्मक अध्यापन; गुणवंत विद्यार्थ्यांसाठी समृद्धी उपक्रम.
- दर महिन्याला विषय शिक्षक बैठक घेऊन चाचणी निकाल व कृतींचा आढावा घेणे.
- ----------
- ----------

विषय शिक्षकांची नावे व स्वाक्षरी : १.

२.

३.

४.

५.

दिनांक: ____ / ____ / २०२६

अ ५.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
विषयातील एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

विषय स्तरावर गुणवत्ता वाढ व ग्रेस गुण कपात उपाययोजना :

- कठीण प्रकरणांचे विशेष पुनरध्यापनः ज्या घटकांमध्ये विद्यार्थी नापास होतात त्या प्रकरणांची उजळणी घेणे.
- आदर्श प्रश्नपेढी (Question Bank): बोर्डाच्या धर्तीवर तयार केलेली विषयाची प्रश्नपेढी व तिचे उत्तरलेखन मार्गदर्शन.
- मासिक चाचण्यांचे विश्लेषणः प्रत्येक चाचणीनंतर कमजोर विद्यार्थ्यांना चिन्हित करून वैयक्तिक समुपदेशन देणे.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांवर भरः १ गुण व २ गुणांच्या प्रश्नांमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवण्यासाठी विशेष सराव संच.
-
-

विषय शिक्षक (१) नाव व स्वाक्षरी

विषय शिक्षक (२) नाव व स्वाक्षरी

विषय शिक्षक (३) नाव व स्वाक्षरी

विषय शिक्षक (४) नाव व स्वाक्षरी

विषय प्रमुख नाव व स्वाक्षरी

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

शाखास्तर (तक्ता अ-६)

स्तर: शाखा स्तर (कला/वाणिज्य/शास्त्र/MCVC)
परीक्षा: इयत्ता १२ वी (HSC) विश्लेषण २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

शाखा: _____ शाखेतील एकूण विद्यार्थी: _____

मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष शाखेच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना:

- मागील निकालाचे घटक/प्रकरण/प्रश्नप्रकारनिहाय विश्लेषण करणे.
- अभ्यासक्रमाचे वेळापत्रक, पुनरावृत्ती व सराव परीक्षांचे कॅलेंडर तयार करणे.
- सामायिक प्रश्नपेढी, आदर्श उत्तरे, गुणदान निकष व उत्तरलेखन मार्गदर्शिका वापरणे.
- कठीण घटकांसाठी उपचारात्मक अध्यापन; गुणवंत विद्यार्थ्यांसाठी समृद्धी उपक्रम.
- दर महिन्याला शाखेतील शिक्षक बैठक घेऊन चाचणी निकाल व कृतींचा आढावा घेणे.
- मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली निकाल सुधारणा समिती स्थापन करणे.
- प्रत्येक शिक्षक, विषय व वर्ग/शाखेसाठी मासिक उद्दिष्टे आणि प्रगतीफलक ठेवणे.
- ----------
- ----------

शाखाप्रमुख ---------- स्वाक्षरी: _____

प्राचार्य: _____ स्वाक्षरी: _____

दिनांक: ____ / ____ / २०२६

अ ६.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
शाखेतील एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

शाखा स्तरावर समन्वयात्मक गुणवत्ता वाढ व ग्रेस गुण कपात उपाययोजना :

- शाखानिहाय अभ्यास गट (Study Circles): हुशार व प्रगतीच्या पथावर असणाऱ्या विद्यार्थ्यांचे गट करून सह-अध्यापनास प्रोत्साहन.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षांचे कठोर नियोजन: MCVC व विज्ञान शाखेतील प्रात्यक्षिकांमध्ये १००% उपस्थिती व नोंदवही सराव.
- शाखा प्रमुखांद्वारे साप्ताहिक आढावा: शाखेतील सर्व विषयांच्या चाचणी निकालांचा तौलनिक अभ्यास करून ग्रेस (सवलतीचे) गुण आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांवर लक्ष.
- उपस्थिती नियंत्रण: गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधून नियमित उपस्थिती सुनिश्चित करणे.
-

विषय शिक्षक प्रतिनिधी नाव स्वाक्षरी

शाखा प्रमुख नाव व स्वाक्षरी

प्राचार्य नाव व स्वाक्षरी

दिनांक: / / २०२६

बोर्ड परीक्षेचा राजमार्ग, सूत्रबद्ध नियोजनातून यशाकडे
निकालाचे सांख्यिकी विश्लेषण व सन २०२७ परीक्षेसाठी श्रेणीनिहाय उद्दिष्ट निश्चिती

कनिष्ठ महाविद्यालयस्तर (तक्ता अ-७)

परीक्षा: इयत्ता १२ वी (HSC) विश्लेषण २०२६, उद्दिष्ट २०२७

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय: _____ तालुका: _____ जिल्हा: _____

प्राचार्यांचे नाव: _____ कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण विद्यार्थी: _____

मागील परीक्षा: विश्लेषण फेब्रुवारी/मार्च २०२६ उद्दिष्ट परीक्षा: मार्च २०२७

गुणांची श्रेणी	२०२६ विद्यार्थी संख्या	२०२६ टक्केवारी	२०२७ उद्दिष्ट विद्यार्थी संख्या	२०२७ उद्दिष्ट %	वाढ/घट (विद्यार्थी)	वाढ / घट टक्केवारी
९० ते १००%						
७५ ते ८९%						
६० ते ७४%						
४५ ते ५९%						
३५ ते ४४%						
० ते ३४%						
एकूण		**१००%**		**१००%**		

उद्दिष्ट निश्चितीची पद्धत: ९० ते १००% श्रेणीत मागील संख्येपेक्षा ५% वाढ; ७५ ते ८९% श्रेणीत ५% वाढ; ६० ते ७४% श्रेणीत १०% वाढ. विद्यार्थी संख्या पूर्णांकात वरच्या पूर्णांकापर्यंत घ्यावी. उर्वरित श्रेणींची उद्दिष्ट संख्या एकूण विद्यार्थीसंख्या कायम ठेवून प्रत्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयाच्या आकडेवारीनुसार निश्चित करावी. टक्केवारी = (त्या श्रेणीतील विद्यार्थी भागिले एकूण विद्यार्थी) गुणिले १००.

निकालातील गुणवत्ता वाढीसाठी उपाययोजना:

- मुख्याध्यापक/प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली निकाल सुधारणा समिती स्थापन करणे.
- प्रत्येक शिक्षक, विषय व वर्ग/शाखेसाठी मासिक उद्दिष्टे आणि प्रगतीफलक ठेवणे.
- नियोजित सराव परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी व निकाल विश्लेषण वेळेत पूर्ण करणे.
- विद्यार्थ्यांची उपस्थिती, अभ्याससवयी, समुपदेशन व पालक संवाद यांचा नियमित आढावा.
- अतिरिक्त मार्गदर्शन तास, अध्ययन साहित्य, ग्रंथालय व प्रश्नसंच उपलब्ध करून देणे.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी उद्दिष्ट विरुद्ध प्रत्यक्ष प्रगतीचे पुनरावलोकन करून सुधारित कृती ठरवणे..
- ----------
- ----------

प्राचार्य नाव _____ स्वाक्षरी: _____

दिनांक: ____ / ____ / २०२६

अ ७.२ : ग्रेस (सवलतीच्या) गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विश्लेषण व २०२७ साठी कपात उद्दिष्ट (५०% कमी करणे)

विवरण	मार्च २०२६ प्रत्यक्ष निकाल	मार्च २०२७ कपात उद्दिष्ट	बदल / सुधारणा
कॉलेजमधील एकूण परीक्षार्थी विद्यार्थी संख्या			
ग्रेस (सवलतीचे) गुण मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी			
ग्रेस गुणांवर उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी (%)			
विना-ग्रेस (स्वबळावर) उत्तीर्ण होणारे लक्ष्यित विद्यार्थी			

कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रशासकीय व शैक्षणिक गुणवत्ता वाढ उपाययोजना :

- महाविद्यालयीन निकाल सुधारणा समितीः प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शाखा प्रमुखांची संयुक्त समिती स्थापन करणे.
- सराव परीक्षांचे नियोजन व मूल्यमापनः किमान २ महाविद्यालयीन सराव परीक्षांचे आयोजन व गुणवत्तेचे मॉनिटरिंग.
- ग्रेस गुण निर्मूलन मोहीमः ५०% ग्रेस गुण कपातीचे ध्येय साध्य करण्यासाठी विशेष 'पासिंग पॅकेज' (Passing Package) वर्ग चालवणे.
